# भारतीय जनता पार्टी

जून २७, २००७

डॉ. किरीट सोमैय्या, माजी खासदार आणि भाजप राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य यांचे प्रसिद्धीपत्रक

## ' शेकडो कोटींचा गहू घोटाळा '
## गह्वाची किंमत, आयात, प्रापण यावर भाजपची व्हाइट पेपरची मागणी

भारत सरकार म्हणजेच पर्यायाने सामान्य माणूस आता १ दशलक्ष टन गव्हाच्या आयातीसाठी रु. ११० कोटी अधिक मोजणार. सामान्य माणसाला प्रति किलो रु. २ अधिक द्यावे लागणार. कृषी आणि ग्राहक मंत्रालयाने २६३ डॉलर दराने १ दशलक्ष टन गहू आयात करण्याची योजना-आदेश मे २००७ मध्ये रद्द केली आहे. आता त्याच कॉंग्रेस-युपीए सरकारने भारतात उतरवल्यावर डॉलर ३०० दराने गहू आयात करण्याची घोषणा केली आहे. जर मे मध्ये भारत सरकारने गहू आयात केला असता तर भारतात उतरवल्यावर त्याची किंमत १२.३० रुपयांऐवजी ११ रुपये असती. सरकारने येत्या दोन महिन्यात ५० लाख टन गहू आयात करण्याची घोषणा केली आहे. म्हणजेच रु. ५५० कोटींचा अतिरिक्त बोजा आपल्यावर पडणार आहे.

भाजप नेते आणि माजी खसदार डॉ. किरीट सोमैय्या यानी मागणी केली आहे कि, या ५५० कोटींच्या गहु घोटाळ्याची सीबीआयकडून चौकशी करण्यात यावी.

राज्य व्यापार मंडळाने २००६ मध्ये युएस डॉलर २००/- च्या भारतात उतरविण्याच्या दराने गहू आयात केला होता म्हणजेच रु. ८.२० प्रति किलो. आता तेच डॉलर ३००/- दराने गहू आयात करणार आहेत म्हणजेच रु. १२.३० प्रति किलो. हे तेच सरकार आहे, ज्याने मे २००७ मध्ये प्रति टन डॉलर २६३ दराने दिलेली १ दशलक्ष टन गव्हाची ऑर्डर रद्द केली.

हे अगम्य आहे कि भारतीय शेतकऱ्याला किमान आधारभूत किंमत म्हणून प्रति किलो रु. ७.५० मिळतात तर सरकारा रु. १२.३० प्रति किलो दराने गहू आयात करते. ग्राहकाना प्रति किलो रु. १५ ते १७/- द्यावे लागतील.

२००५ पूर्वीच्या ६ वर्षात भारताने गहू आयात केला नव्हता. भाजप-रालोआच्या कारकिर्दीत गव्हाचा राखीव साठा १३० दिवस पुरेल एवढा होता. भाजप-रालोआ सरकारच्या अमदानीत भारताकडे गव्हाचा प्रचंड राखीव साठा होता. भारतीय खाद्य मंडळाची गोदामे गहू आणि धान्याने भरलेली होती. कॉंग्रेस-युपीए सरकारने देशाला एक आयातदार देश बनवून टाकले आहे. हे कसे घडले हे भाजप जाणून घेऊ इच्छितो.

तज्ञांच्या मते या वर्षी भारतात गव्हाचा तुटवडा १५० लाख टन असणार आहे. केंद्रीय कृषी आणि ग्राहक व्यवहार मंत्री श्री शरद पवार यानी जाहीर केले आहे कि २००७ मध्ये देशाला ५० लाख टन गहू आयात करावा लागणार आहे. गव्हाचे पुढचे पीक आता मार्च २००८ मध्येच येईल.

भारत सरकारच्या धोरणाने आंतरराष्ट्रीय बाजारात सुद्धा आश्चर्य व्यक्त होत आहे. अशा घोषणेमुळे गव्हाच्या आंतरराष्ट्रीय किंमती १५ % नी वाढल्या आहेत,

कृषी मंत्रालयाने २००६-०७ मधील गव्हाचे पीक, प्रापण, गरज आणि आयात याबाबत केलेली विविध गणिते आणि घोषणा यात विरोधाभास आहे.

अशी भिती व्यक्त केली जात आहे कि या साऱ्या गडबडीमुळे कमोडीटी मार्केटच्या काही मोठ्या कॉर्पोरेट-उच्च स्तरीय खेळाडूना या महिन्यांमध्ये शिकागो कमोडीटी मार्केटमध्ये ''वायदे व्यवहारात'' उतरणे शक्य झाले आहे. या कॉर्पोरेट खेळाडूंसाठी यात शेकडो कोटी रुपयांचा फायदा आहे.

**भाजप जाणून घेऊ इच्छितो कि.**

→ मे २००७ च्या निविदा कां रद्द करण्यात आल्या ?
→ कमोडीटी मार्केटमधील मोठ्या खेळाडूंच्या फायद्यासाठीच हे करण्याता आले कां ?
→ भारतीय शेतकऱ्यांसाठी किमान आधारभूत किंमत रु. ७.५० आणि आयात गव्हाची किंमत रु. १२.५० ?

→ छोटा ग्राहक असलेल्या सामान्य माणसाला प्रति किलो रु. १५ ते १७ द्यायला कां भाग पाडले जात आहे ?
→ चुकीचे आणि दिशाभूल करणारे अंदाज, घोषणा, प्रापण यांची चौकशी ?
→ गव्हाचा एवढा प्रचंड राखीव साठा गेल्या २-३ वर्षात नष्ट होणे ?
→ केंद्र सरकारची उडवाउडवी ?
→ गव्हाची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत २००६ मध्ये २०० डॉलर होती, मे २००७ मध्ये २६३ डॉलर होती आणि जुलै २००७ मध्ये ३०० डॉलर होती. सरकारने आवश्यक असलेल्या आयातीची योग्य योजना कां आखली नाही आणि आता ५० % अधिक देऊ करीत आहे ?

डॉ. किरीट सोमय्या यानी संपूर्ण गहु घोटाळा प्रकरणाच्या सीबीआय चौकशीची मागणी केली आहे.

**(प्रसिद्धी सचिव)**